# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**आष्टी,पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांतील ग्रामपंचायत कार्यालयांना स्वतंत्र इमारत उभारण्यासाठी निधी देण्याबाबत**

**(१) ६३२२५ (३१-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी,पाटोदा व शिरूर (जि.बीड) तालुक्यांतील ग्रामपंचायत कार्यालयांना स्वतःची स्वतंत्र इमारत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु चौकशीत आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यांतील किती ग्रामपंचायत कार्यालयांना स्वतंत्र इमारती नसल्याचे निदर्शनास आले आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, सदरहू ग्रामपंचायत कार्यालयांना स्वतःची स्वतंत्र इमारत उभारण्यासाठी आवश्यक निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२४-०४-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२)

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | ग्रा.पं.संख्या | स्वतंत्र इमारत असलेल्या ग्रा.पं. | ग्रा.पं. इमारत नसलेल्या ग्रा.पं. |
|---|---|---|---|---|
| १ | आष्टी | १२१ | ८२ | ३९ |
| २ | पाटोदा | ५९ | ३४ | २५ |
| ३ | शिरुर का | ५१ | ३४ | १७ |

(३), (४) व (५) १४ व्या वित्त आयोगाकडून निधी थेट ग्रामपंचायतीस उपलब्ध करुन दिला जातो. ग्रामसभा ठराव करुन ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम करु शकते.

केंद्र शासनाच्या राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानाअंतर्गत ग्रामपंचायत इमारत बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन दिला जात होता. परंतु या योजनेस सन २०१५-१६ या वित्तीय वर्षापासून आर्थिक सहाय्यतेतून वगळलेले आहे. त्यामुळे ग्रामपंचायत इमारत बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन दिला जात नाही.

---

## चाळीसगाव (जि.बुलढाणा) पंचायत समितीच्या कार्यालयात गोठा मंजुर करण्यासाठी आलेल्या प्रस्तावाबाबत

**(२) ८४२०३ (२०-०४-२०१७). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगाव (जि.बुलढाणा) पंचायत समितीच्या कार्यालयात गोठा मंजुर करण्यासाठी ५०० ते १००० पर्यंत प्रस्ताव प्रलंबित असताना पुन्हा नवीन तब्बल ५ ते ६ हजार प्रस्ताव अजून जमा झाल्याची बाब दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव निकाली काढण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावांना मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०४-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ८१ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आलेली आहे.

(३) पंचायत समिती स्तरावर कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वर्धा येथील जलयुक्त शिवार आढावा बैठकीत घोषित केल्याप्रमाणे खचलेल्या व बुजलेल्या विहिरीला सरसकट सर्व शेतक-यांना समान मदत मिळण्याबाबत

**(३) ८८५२२ (१९-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा येथील जलयुक्त शिवार आढावा बैठकीत मा. मुख्यमंत्री यांनी घोषित केल्याप्रमाणे खचलेल्या व बुजलेल्या विहिरीला सरसकट सर्व शेतक-यांना समान मदत मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (हिंगणघाट) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २९ जून, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१३-११-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासनाने क्र.मग्रारो २०१४/ प्र.क्र.२५/ मग्रारो-१, दिनांक २३ मे, २०१४ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन दिनांक २० जुलै, २०१५ चा सुधारित शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(३) व (४) दिनांक २० जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये जिल्ह्यातील ज्या क्षेत्रामध्ये अतिवृष्टी अथवा पूरपरिस्थिती निर्माण झालेली आहे, त्या क्षेत्रातील तलाठी, कृषी सहायक व तांत्रिक अधिकारी यांनी खचलेल्या व बुजलेल्या विहिरींचे संयुक्तपणे पंचनामे करावे व खचलेल्या व बुजलेल्या विहिरींचे दुरुस्तींची कामे नरेगा अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुज्ञेय करण्यात आलेली आहेत.

---

**सोनार्ली (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) वसाहतीमध्ये मुलभूत सुविधाकरीता निधी मिळणेबाबत**

**(४) ९५६६१ (०२-०१-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हातकणंगले (जि.कोल्हापूर) तालुक्यात सन १९८५ साली वारणा धरणातील बुडीत क्षेत्रातील मु.सोनार्ली (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथून स्थलांतर करून पुनवर्सन करण्यात आलेल्या सोनार्ली वसाहतीतील रहिवाश्यांकरीता गेली ३२ वर्ष उलटून गेली असताना देखील सदरहू वसाहतीमध्ये अद्याप मुलभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदरहू वसाहतीमधील मुलभूत सुविधांची विकास कामे करण्याकरीता किती निधी देण्यात येणार आहे,
(३) असल्यास, सोनार्ली वसाहतीमध्ये मुलभूत सोयी सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०६-२०१८) :** (१), (२) व (३) सोनार्ली, तालुका शाहुवाडी या गावातील बुडीत क्षेत्राच्या बाहेरील धनगरवाडा वगळून वारणा धरणाच्या बुडीत क्षेत्रात येणा-या लोकांचे पुनर्वसन सन-१९८५ मध्ये वडगांव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथील गायरानामध्ये करणेत आलेले आहे. पूनर्वसन वसाहतींना अनुज्ञेय १८ नागरी सुविधांपैकी १० नागरी सुविधा जलसंपदा विभागामार्फत व उर्वरित ८ नागरी सुविधा महसूल विभागामार्फत देणे आवश्यक आहे. जलसंपदा विभागामार्फत देण्यात येत असलेल्या १० नागरी सुविधापैकी ९ सुविधा पुरविणेत आल्या असून एका सुविधेच्या पूर्ततेची कार्यवाही प्रगतीत आहे.

सोनार्ली ग्रामविकास समिती पेठ-वडगांव-१ यांनी दिनांक १८/०८/२०१७ च्या पत्रान्वये सोनार्ली गावठाणातील दहनभूमीकडे जाणारा पोहोच रस्ता, नदीतून शाश्वत पाणी पुरवठा व इतर वाढीव नागरी सुविधांची मागणी केली आहे. या नागरी सुविधा पुरविण्यासाठी महसूल विभागाकडून निधी प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१७-१८ व २०१८-१९ मध्ये आवश्यक रु.३.१९ कोटी निधीचा तपशील महसूल विभागास सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रस्ते, विज, सिंचन आणि वाहतूकीसारख्या पायाभूत सुविधांचे सर्वाधिक प्रकल्प पुर्ण करण्यास निधी देण्याबाबत

**(५) ९५९७३ (२६-१२-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रस्ते, वीज, सिंचन आणि वाहतूकीसारख्या पायाभूत सुविधांचे सर्वाधिक प्रकल्प केंद्र शासनाच्या माध्यमातून सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाने सदर प्रकल्पांच्या खर्चासाठी किती निधी शासनाला दिला आहे व सदर प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(३) असल्यास, सदर प्रकल्प तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) रस्ते विकासासाठी केंद्रीय मार्ग निधी योजनेंतर्गत एकूण रु.७५७५.१८ कोटी अंदाजित किंमतीची ९७६ कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यासाठी रु. ३९८०.६३ कोटी एवढा निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार रस्त्याची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

राज्यातील शहरी भागात वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधांसाठी एकात्मिक उर्जा विकास योजनेसाठी केंद्र शासनाने रु. २३००.०० कोटीची योजना मंजूर केली असून त्यापैकी केंद्र शासनाच्या ६० % हिश्श्यापैकी रु. ३००.५० कोटी रक्कम मार्च, २०१८ पर्यंत प्राप्त झाली आहे. ग्रामीण भागात वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेसाठी रु. २१६४.१४ कोटीची योजना मंजूर असून त्यामधील केंद्र शासनाच्या ६० % हिश्श्याचा रु. ३६४.३९ कोटी निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला आहे. या दोन्ही योजना मार्च, २०१९ पर्यंत पूर्ण करावयाच्या आहेत.

प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत राज्यातील २६ प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत. त्यासाठी केंद्र शासनाकडून सन २०१६-१७ व २०१७-१८ या कालावधीत रु. ५२२.८७ कोटी एवढा निधी प्राप्त झाला असून नाबार्ड कडून रु. ३१०६.४० कोटीचे कर्ज प्राप्त झाले आहे. सन २०१६-१७ मध्ये २६ पैकी ३ प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

बंदरे विभागामार्फत सागरमाला कार्यक्रमांतर्गत प्रवासी वाहतुकीसाठी रु. २४०.६६ कोटी किंमतीच्या ११ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून केंद्र शासनाच्या ५०% हिश्श्यापैकी रु. १०६.४५ कोटी निधी प्राप्त झाला आहे. ११ पैकी ३ कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरीत कामे १८ महिन्यात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

परिवहन विभागांतर्गत महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्या आर्थिक सहभागातून (कॉस्ट शेअरींग)

(अ) अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ

(ब) वर्धा-नांदेड-यवतमाळ-पुसद
(क) वडसा-देसाईगंज-आरमोरी-गडचिरोली हे तीन रेल्वे प्रकल्प राज्यात सुरु असून हे प्रकल्प अनुक्रमे सन २०२६, २०२३ व २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या ३ प्रकल्पांसाठी केंद्राकडून रु. १३२०.५५ कोटी इतका निधी उपलब्ध करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौज हेत (ता.वैभववाडी,जि.सिंधुदुर्ग) येथील अरूणा मध्यम पाटबंधारे प्रकल्पात प्रकल्पग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(६) ९७७६९ (२६-१२-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौज हेत (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील अरूणा मध्यम पाटबंधाऱ्यांच्या सुमारे ५३.८४ कोटी रूपयांच्या अंदाजीत खर्चास शासन निर्णय क्रमांक अरूणा १०८५/(२०९/८६)-जसंअ, दिनांक ५ डिसेंबर, १९९५ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यानंतर विलंबामुळे पुन्हा प्रशासकीय, प्रथम सुधारीत व तद्नंतर द्वितीय सुधारीत ६६९.८० कोटी अंदाजीत खर्चास शासन निर्णय क्रमांक सुप्रमा २०११/२१८/(८२/११)/मप्र, दिनांक २५ मे, २०१२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पासाठी मौजे आखवणे, भोम, नागपवाडी ही तीन गावे पूर्णत: बाधित होणार असून हेत हे गाव अंशत: बाधित होणार असल्याने बुडीत क्षेत्रातील गावाचे पुनर्वसन मौजे मागवली तिठा व वेंगसर याठिकाणी करावयाचे निश्चित करण्यात आलेले असतानाही आजमितीस सदरहू प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे जवळजवळ ७० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झालेले असतानाही प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनास विलंब झाल्याने याबाबत शासनाने चौकशी कली आहे काय व त्यानुसार सदरहू प्रकल्पबाधित चार गावातील प्रकल्पग्रस्तांचे सर्व सुविधांसमवेत तात्काळ पुनर्वसन होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) बुडीत क्षेत्रातील तीन गावांचे पुनर्वसन हे मांगवली तिठा व वेंगसर येथे करण्याचे नियोजन आहे. मांगवली तिठा येथील गांवठाणामधील नागरी सुविधांची कामे सुमारे ९० % पूर्ण झालेली आहेत. मौजे वेंगसर येथील गांवठाणामधील नागरी सुविधांची कामे ९५ % पूर्ण झालेली आहेत. वरील प्रमाणे नागरी सुविधांची कामे पूर्ण असून भूखंड वाटपासाठी तयार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोझरी वलगाव व कोंडण्यापूर (जि.अमरावती) विकास आरखडयांतर्गत**
**ब्रॉन्झ धातुचा पुतळा उभारण्याबाबत**

**(७) ९९५१७ (०१-०१-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोझरी वलगाव व कोंडण्यापूर (जि.अमरावती) विकास आरखडयांतर्गत ब्रॉन्झ धातुचा पुतळा उभारण्यासाठी मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री, यांना दिनांक २९ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०६-२०१८) :** (१) व (२) होय. सन्माननीय स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक २८ जुलै, २०१७ रोजीच्या निवेदनास अनुसरून वलगांव, मोझरी, कौंडण्यपूर येथिल विकास आराखड्यांतर्गत "ब्राँझ पुतळे" उभारण्यासंदर्भात प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. वलगांव विकास आराखडयांतर्गत संत गाडगेबाबा यांचा "ब्राँझ पुतळा" उभारण्याच्या कामास दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त मोझरी विकास आराखड्या अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि कौंडण्यपूर विकास आराखड्यांतर्गत विठ्ठल-रूक्मिणी यांचे "ब्राँझचे पुतळे" उभारण्यासंदर्भात, या आराखड्यातील मंजूर व सुरू कामे प्राथम्याने पूर्ण करून, उपलब्ध निधीच्या मर्यादेत सुचविण्यात आलेल्या विविध नवीन कामांच्या प्रस्तावांबाबत विचार करताना "ब्राँझ पुतळा" उभा करण्याच्या बाबतीत ही शासनस्तरावर स्वतंत्रपणे निर्णय घेण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यभरातील ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये शासनाने कपात केल्याबाबत**

**(८) ९९७८५ (१२-०१-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये शासनाने कपात केल्याचे दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाटासारख्या संशोधन संस्थेमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी आर्थिक अडचणीत आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओबीसी विदयार्थ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डोंगरगाव (भेंडाळा) प्रकल्पाच्या (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) कालव्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(९) १०१६८० (२६-१२-२०१७). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंगरगाव (भेंडाळा) प्रकल्पाच्या (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) कालव्याचे काम मागील १७ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण झाल्यास तालुक्यातील ११ गावातील शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) होय. डोगंरगाव मध्यम प्रकल्पांतर्गत एकूण ३९४२ हे. सिंचन क्षमतेपैकी ३६०६ हे. सिंचन क्षमता निर्मिती झाली असून सदर प्रकल्प जून २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बेंडारा(भेंडाळा) मध्यम प्रकल्पाचे काम भूसंपादन पुनर्वसनाबाबतच्या अडचणीमुळे ऑक्टोबर २०१२ पासून बंद आहे.

(२) डोंगरगाव प्रकल्पाद्वारे राजूरा तालुक्यातील ९ गावातील (चिंचाळा, डोंगरगाव, तुम्मागुडा, विरूर स्टे., सुबई, धानोरा, कविठपेठ, देसाईपेठ, व चिंचोली) शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध होणार आहे.

बेंडारा मध्यम प्रकल्पाचे लाभक्षेत्र १३ गावांना (भेंडाळा, नवेगाव, केळझी, चिंचबोडी चिरूड, टेंबुरवाही, सिर्सी खांबाडा विरूर स्टेशन, सिंधी, जलफडी, मुर्ती बेरडी) सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्पातील कामे भूसंपादन प्रक्रिया , पुनर्वसन झाले नसल्यामुळे थांबलेली आहेत.

(३) डोंगरगाव मध्यम प्रकल्पाच्या समावेश केंद्र शासन अर्थसहाय्यित पंतप्रधान कृषी सिंचन योजनेत करण्यात आला असून प्रकल्पाचे काम जून २०१८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

बेंडारा प्रकल्पामुळे बेरडी (नवीन) व बेरडी (जुनी) अशी दोन गावठाण पुनर्वसीत होत असून बेरडी (नवीन) येथील गावकऱ्यांचे पुनर्वसन भेंडाळा गावाजवळ शासकीय जागेवर प्रस्तावित असून भूखंड वाटप करण्यात आले आहेत. सदर प्रकल्पाचा सानुग्रह अनुदान प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या ६९ व्या बैठकीत मान्य झाला आहे. प्रकल्पाचे जलमग्न क्षेत्रासाठी लागणाऱ्या ३८०.२५ हेक्टर जमीनीची संपादन कार्यवाही सूरू

आहे. तसेच सांडव्यासाठी व धरण बैठकीसाठी लागणाऱ्या १०.५९ हे. जमिनीचे सरळ खरेदीचे प्रस्ताव कार्यवाहीत असून भूसंपादन व सानुग्रह अनुदान मंजूर करून पुढील दोन वर्षात प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या कर्मचा-यांना नियमित पेंशन लागू करण्याबाबत

**(१०) १०२०१७ (०६-०१-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या धरतीवर राज्यानेही डी सी पी एस/ऐन पी एस योजना लागू केली,केंद्र सरकारने दिनांक ३ मे, २००९ रोजी शासन निर्णय काढून,मृत व अपंग कर्मचाऱ्यास कुटुंब निवृत्ती वेतन व सेवा उत्पादन (ग्र्याजुटी) देण्याचा निर्णय घेतला आहे तसेच राज्य शासनाच्या सेवेत दिनांक १ नोव्हेंबर, २००५ व त्या नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना शासनाने डीसीपीएस / एनपीएस ही पेन्शन योजना लागू केली आहे, सदर DCPS / NPS धारक कर्मचारी मृत झाल्यास त्याची सदर योजनेत फक्त जमा असलेली पूर्ण रक्कम राज्य शासनाकडून परत करण्यात येईल. मात्र त्यांना ८० % रक्कमेवर पेन्शन दिली जाणार नाही, असा निर्णय दिनांक १८ ऑगस्ट, २००९ व १२ नोव्हेंबर, २०१० तसेच इतर शासन निर्णयाद्वारे घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वित्त विभागाच्या दिनांक २२ फेब्रुवारी,२०१५ च्या शासन निर्णयानुसार दिनांक १ नोव्हेंबर पासून सेवेत असणाऱ्या कर्मचारी यांच्या मृत्यूनंतर राज्यात किती मृत कर्मचाऱ्यांच्या आई-वडील,पत्नी यांना कुटुंब निवृत्ती वेतन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच वरिष्ठ वेतनश्रेणीचा (२३ ऑक्टोबर, २०१७) चा शासन निर्णय GR काढून नवीन शिक्षकांवर ज्या जाचक अटी लावल्या आहेत,त्या पदोन्नती किंवा वेतनश्रेणीला योग्य नसल्याने तो शासन निर्णय, GR रद्द करणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, DCPS/ NPS योजनेतून सदर कर्मचाऱ्यांना मृत्यू नंतर पेन्शन देता येत नसेल व त्यांना फक्त त्यांची जमा रक्कम परत केली जात असेल तर ते त्यांच्यावर अन्याय होत असल्याने त्यांना १९८२ व १९८४ ची पेन्शन योजना लागू करण्यात यावी अशी मागणी सदर कर्मचारी व संघटनांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मागणीनुसार कर्मचाऱ्यांना १९८२ व १९८४ ची पेन्शन योजना लागू करण्यासह नवीन शिक्षकांच्या पदोन्नतीला व वेतनश्रेणीला जाचक असलेल्या अटी शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही. शासन निर्णय दि.१८ ऑगस्ट, २००९ अन्वये राज्याच्या एका सेवेतून राज्याच्या दुस-या सेवेत दि.०१/११/२००५ नंतर रुजू होणा-या कर्मचा-यांना लागू होणा-या निवृत्तीवेतन योजनेबाबत स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णय दि.१२ नोव्हेंबर, २०१० अन्वये नविन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजनेच्या अंशदानाच्या रक्कमा परत करण्याबाबतची कार्यपध्दती स्पष्ट करण्यात आलेली आहे. या दोन्ही शासन निर्णयामध्ये ८० टक्के रक्कमेवर पेन्शन दिली जाणार नाही, असा कोणताही उल्लेख केलेला नाही. तथापि, PFRDA कडील अधिसूचना दिनांक ११/०५/२०१५ मधील ३ (सी) अनुसार सभासदाचे दिनांक ०१/०४/२०१५ व तद्नंतर सेवेत असताना निधन झाल्यास त्याच्या एनपीएस (PRAN) खात्यात जमा असलेली रक्कम रुपये २ लाखापेक्षा कमी असल्यास सर्व जमा रक्कमेचा परतावा देण्याची तरतूद असून २ लाखापेक्षा जास्त रक्कम जमा असल्यास जमा रक्कमेच्या ८० टक्के रक्कम ॲन्युटी मध्ये गुंतविण्यात येऊन त्यावर देय होणारी पेन्शन देण्याची व उर्वरित २० टक्के रक्कम वारसास देण्याची तरतूद आहे. तथापि राजपत्रातील ३ (सी) मधील उपरोक्त तरतूदीनुसार सद्यस्थितीत निधन प्रकरणात ॲन्युटी सर्व्हीस उपलब्ध नसल्यामुळे PFRDA कडील परिपत्रक क्रमांक PFRDA/२०१६/५/Exits/०१ दिनांक १०/०३/२०१६ अन्वये निधन झालेल्या सभासदाचे एनपीएस (PRAN) खात्यात जमा असलेली सर्व रक्कम (१०० टक्के) निधन झालेल्या सभासदाच्या वारसास परतावा देण्याची तरतूद आहे.

DCPS धारक कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास त्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना ठोक रक्कम देणेबाबतचा विचार करण्यासाठी शासनाने मा.मंत्री (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. सदर समितीने ठोक रक्कम देणेबाबत काही शिफारशी शासनास केल्या असून त्या शासनाच्या विचाराधीन आहेत.

(२) दिनांक २२/०२/२०१५ रोजी सदर विषयाच्या अनुषंगाने कोणताही शासन निर्णय वित्त विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेला नाही.

(३) दिनांक २३/१०/२०१७ च्या शासन निर्णयातील अटी विद्यार्थीची गुणवत्ता वाढविण्यासाठी आहेत. शासन निर्णय रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ ही निवृत्ती वेतन योजना लागू करण्याची मागणी कर्मचारी व संघटनाकडून होत आहे.

(५) व (६) जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतचे प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. दिनांक २३/१०/२०१७ च्या शासन निर्णयातील अटी विद्यार्थीची गुणवत्ता वाढविण्यासाठी आहेत. शासन निर्णय रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील भीमा-सिना जोड कालव्यावर असलेल्या बोगद्यात दरवाजे बसविण्याबाबत

**(११) १०२६७२ (०२-०१-२०१८). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील भीमा-सिना जोड कालव्यावर असलेल्या बोगद्यात उजनी प्रकल्पामधून पाणी सोडल्यानंतर हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येत असून किमान ९ ते १० गावांना लाभ होतो तसेच सदर जोडकालव्यात सिना नदी मधूनही शेती व पिण्यासाठी पाणी सोडले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोडण्यात येणारे पाणी बंद केल्यानंतर बोगद्यातील पाणी वाहून जाऊन बोगदा रिकामा होत असल्यामुळे बोगद्यात पाण्याची साठवणूक रहावी यासाठी बोगद्याच्या शेवटी असलेल्या कव्हे (ता.माढा) येथील खटकाळी बंधारा येथे दरवाजा बसविण्यात यावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री व मा.राज्यमंत्री यांचेकडे दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोगद्यातील पाणी वाहून जाऊ नये यासाठी मागणीच्या अनुषंगाने बोगद्याच्या शेवटी दरवाजे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

उजनी धरणावरील भीमा सीना जोड कालवा प्रकल्पांतर्गत भीमा सीना जोड कालव्यावर (बोगद्यावर) ११८० हे. देय क्षेत्रापैकी आतापर्यंत १८ गावातील ११३३.७० हेक्टर इतके क्षेत्रासाठी पाणी परवाने दिलेले आहेत. भीमा सीना जोड कालव्याद्वारे सिंचनासाठी तसेच जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी पिण्याच्या पाण्यासाठी आकस्मिक आरक्षण केल्यास मोहोळ शहर व सीना नदीवरील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी पाणी सोडले जाते.

(२) होय.

(३) यासंदर्भात मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०७/११/२०१७ रोजी बैठक संपन्न झाली. सदरहू बैठकीमध्ये भीमा सीना जोड कालव्याच्या भागात द्वार बसविण्याबाबत तांत्रिक व सामाजिक दृष्टीकोनातून सर्वकष अभ्यास करण्यात यावा व याबाबतचा अहवाल सादर करावा असे निर्देश मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांनी दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील अजिंठा डोंगराजवळील साठवण तलावावरील पाटचारीच्या गेटमधून पाणी गळती होत असल्याबाबत

**(१२) १०२९६२ (०२-०१-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयातील बनोटी गावातून वाहणा-या हिवरा नदीवरील अजिंठा डोंगराजवळील साठवण तलावावरील पाटचारीच्या गेटमधून पाणी गळती होऊन दररोज हजारो लिटर पाणी वाहून जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थाना पिण्याच्या पाण्याचा व शेतक-यांना रब्बी पिकाकरीता पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर साठवण तलावाची पाहणी केली आहे काय व त्यानुसार तलावाच्या पाटचारीमधून होणारी पाणी गळती बंद थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
बनोटी लघु सिंचन प्रकल्पाच्या पाटचारीच्या गेट मधून किरकोळ स्वरुपात गळती झाल्याचे माहे सप्टेंबर-२०१७ मध्ये निदर्शनास आले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) तलावाच्या पाटचारी मधून होणारी अल्प प्रमाणातील पाणी गळती बंद करण्यासाठी सप्टेंबर २०१७ मध्ये तलावाच्या HR गेट मध्ये मातीच्या गोण्या भरुन टाकण्यात आल्या व सदर गळती तात्काळ बंद करण्यात आली.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांसाठी असलेला परिपोषण आहार भत्ता एक वर्षापासून प्रलंबित असल्याबाबत

**(१३) १०४७९९ (०७-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अ‍ॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना परिपोषण आहार योजनेंतर्गत दर महा ९०० रुपये दिले जातात मात्र राज्यातील समाजकल्याण व ओबीसी या दोन विभागाच्या मतभेदामुळे मागील एका वर्षापासून मागासवर्गीय विद्‌यार्थ्यांना परिपोषण आहार योजनेचे भत्ते मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार विद्यार्थ्यांना एक वर्षापासून न मिळालेला परिपोषण आहार भत्ता तात्काळ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (११-०६-२०१८) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंभे जलविद्युत (ता.माणगांव, जि.रायगड) प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) १०५२६४ (१३-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयातील माणगांव तालुक्यातील बहुउद्देशीय कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे काम प्रशासकीय मान्यताप्राप्त खर्चापेक्षा जास्त खर्च झाला असल्याने थांबविण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे १०० कोटीची मान्यता असलेला या प्रकल्पावर सुमारे २१२ कोटी रुपये अवाढव्य खर्च करण्यात येऊनही सदर प्रकल्प प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

कुंभे जलविद्युत प्रकल्पास स्वतंत्र प्रशासकीय मान्यता नाही. काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्पास दिनांक ०६.०१.२०११ च्या शासन निर्णयान्वये ७४०.४४ कोटी इतक्या रक्कमेची एकत्रित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, आजतागायत एकत्रित खर्च रु. ११८१.५५ कोटी हा तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त झाला असल्याकारणाने शासन पत्र दिनांक २९.०९.२०१५ अन्वये सदर प्रकल्पावर यापुढे खर्च करण्यात येवू नये, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे प्रकल्पांची कामे संस्थगित ठेवण्यात आली आहेत.
(२) अंशत: खरे आहे.

काळ कुंभे जलविद्युत प्रकल्पाचे तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमतीमध्ये, कुंभे जलविद्युत प्रकल्पासाठी रु. २५८.३८ कोटीची (स्थापत्य कामासाठी रु.२०९.०३ कोटी व विद्युत कामासाठी रु. ४९.३५ कोटी) तरतूद आहे. सदर प्रकल्पावर आजतागायत एकूण २४३.२७ कोटी (स्थापत्य घटकांवर रु. २००.३१ + विद्युत व यांत्रिकी घटकांवर रु. ४२.९६ कोटी) एवढा खर्च झालेला आहे. कुंभे जलविद्युत प्रकल्पाच्या विविध घटकांची कामे सुमारे ७५% पर्यंत पूर्ण

झाली आहेत. सद्यस्थितीत काळ-कुंभे जलविद्युत प्रकल्पाचा एकत्रित खर्च, प्रकल्पास प्राप्त असलेल्या तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेपेक्षा अधिक झाला असल्याने प्रकल्पाची कामे संस्थगित ठेवण्यात आली आहेत.

(३) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. जविप्र-२०१७/प्र.क्र. २०१/जवि, दिनांक २१.०२.२०१८ अन्वये काळ व कुंभे जलविद्युत प्रकल्प BOT तत्वावर पूर्ण करण्याकरिता BOT प्रस्ताव, संबंधित निविदा प्रक्रिया व कंत्राटाबाबत कार्यवाही करण्याकरिता कृतिगटाचे गठन करण्यात आले आहे. सदर कृतिगटाकडून पुढील ३ महिन्यात BOT प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिखली- जालना या राष्ट्रीय महामार्गावर लगत धरणाकडे जाणा-या रस्त्यावर संत चोखा सागर जलाशयाचे मुख्य प्रवेशद्वारावर संताचे अपूर्ण नाव दिल्याबाबत**

**(१५) १०६४२२ (१३-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली- जालना या राष्ट्रीय महामार्गावर लगत धरणाकडे जाणा-या रस्त्यावर संत चोखा सागर जलाशयाचे मुख्य प्रवेशद्वारावर असलेल्या अर्धवट नावामुळे महान संताच्या नावाची अवहेलना होत असल्याचे स्थानिकांनी संबधित अधिका-यांकडे दिनांक ५ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार संबधित विभागाने अद्यापपर्यंत कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) दिनांक ११/१२/२०१७ रोजीचे दैनिक सकाळ या वृत्तपत्रात सदरची बातमी आलेली होती.

(२) सदर प्रवेशव्दारावरील "संत चोखामेळा"हे नाव सुस्थितीत आहे. सदर फलकातील जलाशय या शब्दातील 'ज', खडकपूर्णा या शब्दातील क व विकास या शब्दातील का ही अक्षरे नैसर्गिक कारणामुळे निखळून गेलेली होती, ती आता पूर्ववत करण्यात आलेली आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मध्य वैतरणा जलविद्युत प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत**

**(१६) १०६८२९ (२८-०३-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील मध्य वैतरणा जल विद्युत या प्रकल्पाच्या सल्लागार मंडळावर ५१ कोटी रुपये खर्च केल्यानंतर आता या प्रकल्पाकरिता नियुक्त केलेले सल्लागाराचे कंत्राट रद्द करण्याचे निर्णय जलसंपदा विभागाने घेतल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या मध्य वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी सन २०१० पासून पालिकेने राज्य शासनाकडे पाठपुरावा करुनही अद्याप या प्रकल्पाला परवानगी दिली नसल्यामुळे हा प्रकल्प प्रलंबित असल्याची बाब दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगर पालिकेच्या, मध्य वैतरणा प्रकल्पावर, २५ मेगा वॅट जलविद्युत प्रकल्पाचे सर्वेक्षण व अन्वेषण करुन, प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तयार करण्यासाठी दिनांक २८ फेब्रुवारी,२०११ अन्वये शासनाने मे. महालक्ष्मी कोनाल ऊर्जा प्रा.लि. पुणे यांना परवानगी देऊनही ७ वर्षात सदरहू कंपनीने अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच उक्त प्रस्तावास शासनाने सात वर्षात मंजूरी न दिल्यामुळे सदरहू जलविद्युत निर्मिती, प्रकल्प उभारण्याचा अहवाल आणि प्रकल्प कार्यान्वित करण्याकामी, मुंबई महापालिकेने सन २००८ मध्ये नेमलेल्या मे.ट्रायगॉन कन्सल्टंटस कंपनीवर खर्च केलेले सुमारे ५१ कोटी रुपयांचे मुंबई महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार मध्य वैतरणा जल विद्युत प्रकल्पाचे काम प्रलंबित ठेवणाऱ्या संबंधित ठेकेदारावर व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह ७ वर्षात जलविद्युत प्रकल्पाचे काम न करणा-या कंपनीची परवानगी तात्काळ रद्द करुन सदरहू प्रकल्पाचे काम मुंबई महानगर पालिकेस देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रकल्पाला परवानगी दिली नाही, हे खरे नाही.

मध्य वैतरणा हा बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी पाणी पुरवठा प्रकल्प आहे.

राज्यातील जलविद्युत प्रकल्पांचे सर्व्हेक्षण, नियोजन व कार्यन्विनीकरण करणे ही जबाबदारी जलसंपदा विभागावर सोपविण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाने दिनांक १५.०९.२००५ च्या शासन निर्णयान्वये जाहिर केलेल्या धोरणानुसार, २५ मे.वॅ. पर्यंतचे, जलविद्युत प्रकल्प हे खाजगी प्रवर्तकांना विकसनासाठी देण्यात येतात. या धोरणानुसार मे.महालक्ष्मी कोनाल उर्जा प्रा.लि., पुणे यांनी दि. २०.०१.२०१० रोजी जलविद्युत प्रकल्प विकसनाखाली मागणी केली होती. तसेच मुंबई महानगरपालिकाने दि.३०.०६.२०१० अन्वये हा प्रकल्प जलविद्युत विकसनासाठीची मागणी शासनाकडे केली होती, त्यामुळे प्रथम मागणी करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार मे. महालक्ष्मी कोनाल ऊर्जा प्रा.लि., पुणे यांच्या मागणीचा विचार होऊन शासनाने पत्र दि. २८.२.२०११ अन्वये

सर्वेक्षण व अन्वेषण करुन प्रकल्पाचा तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

(३) प्रकल्पास आवश्यक ९.०० हे वनजमीन ही बृहमुंबई मनपा यांनी मध्य वैतरणा प्रकल्पाकरिता संपादन केलेल्या क्षेत्रापैकी आहे. वनविभाग/बृहमुंबई मनपा कडे पत्रव्यवहार सुरु आहे. वनजमीन अप्राप्त असल्याने प्रकल्पाचे काम करता आलेले नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि.२८.०२.२०१८ अन्वये कळविल्यानुसार सल्लागाराचे फी वर रु.४९.०८ लाख खर्च केलेले आहेत.

(५) सदर जलविद्युत प्रकल्प विकसनासाठी यापूर्वीच मे.महालक्ष्मी कोनाल उर्जा प्रा.लि. पुणे यांना देण्यात आलेला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावावर माजी मुख्यमंत्री यांनी दिलेले अभिप्राय पुनर्विलोकनासाठी उचित स्तरावर विचाराधीन आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती उध्व्रवर्धा प्रकल्पाच्या पाणी वितरणासाठी आवश्यक २२ शाखांचे आकृतीबंध मंजूर करण्याबाबत**

**(१७) १०७००० (१०-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती उध्व्रवर्धा प्रकल्पाच्या पाणी वितरणासाठी आवश्यक २२ शाखांचे आकृतीबंध मंजूर करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करण्यात यावी यासाठी मा.पालकमंत्री, अमरावती यांनी दिनांक २ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर निर्देशानुसार अमरावती उध्व्रवर्धा प्रकल्पाच्या पाणी वितरणासाठी आवश्यक २२ शाखांचे आकृतीबंध मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील मंजूर पदांचा आकृतीबंध सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सुधारित आकृतीबंध निश्चित झाल्यानंतर सिंचन व्यवस्थापन शाखा कार्यालयांना पदे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

---

**विदर्भातील धरणस्थळी असलेल्या माती नमुन्यांची तपासणी केली असता सदर माती बांधकामासाठी निकृष्ट असल्याबाबत**

**(१८) १०७९८६ (१०-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला पाटबंधारे विभाग अकोला अंतर्गत असलेल्या माती चाचणी उप विभागीय कार्यालयास इंटर नेशनल नॅशनल मॅनेजमेंट ऑक्रिडिशन बोर्ड सिंगापूर यांचेकडून माहे जानेवारी २०१८ मध्ये आयएसओ ९००१-२०१५ मानांकन देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उप विभागीय माती परीक्षण प्रयोग शाळेत पश्चिम विदर्भातील धरणस्थळी असलेल्या माती नमुन्यांची तपासणी केली असता सदर माती बांधकामासाठी निकृष्ट असल्याचा निष्कर्ष काढण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निकृष्ट दर्ज्याच्या मातीमुळे तसेच खारपाण पट्ट्यातील माती वापरायोग्य नसल्याने लांब अंतरावरून माती वहन करण्यात येते परिणामी खारपाण पट्ट्यातील धरणांच्या किंमती वाढतात अशी माहिती कार्यकारी अभियंता, अकोला पाटबंधारे विभाग अकोला यांनी निदर्शनास आणून दिली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार खारपाण पट्टा असलेल्या पश्चिम विदर्भासाठी बांधकामाचे आर्थिक निकष वाढवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) होय.

(२) नाही, सदर उपविभागामध्ये मृद तपासणीत अशा प्रकारचे निष्कर्ष काढण्यात आले नाहीत.

(३) नाही. खारपाणपट्टयातील प्रकल्पांच्या पायासाठी योग्य भूस्तर सुमारे ५० मीटर खोलीपर्यंत मिळत नसल्यामुळे व मूरूम उपलब्ध नसल्याने मुरुम लांब अंतरावरून आणावा लागतो, या कारणांमुळे प्रकल्प खर्चात वाढ होत आहे.

(४) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.मापदंड २३०६/(३५८/२००६)/ ल.पा.२, दि.०३/०१/२००८ अन्वये खारपाण पट्ट्यातील योजनांचे मापदंड सर्वसाधारण क्षेत्रातील मापदंडांच्या ३ पट ठेवलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू-नाशिक राज्य मार्गावरील पुलाची झालेली दुरवस्था

**(१९) १०८०३८ (२८-०३-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सूर्या प्रकल्पांतर्गत कालवा साखळी क्र.११/३७५ डहाणू-नाशिक राज्य मार्गावरील पूलाचे स्लॅब निखळून गंजलेल्या सळई बाहेर पडून पूल जीर्ण होऊन वाहतूकीस धोकादायक झाला असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सूर्या प्रकल्पांतर्गत उजवा तीर कालवा आणि डावा तीर कालव्यांअतर्गत किती पुलाची कालमर्यादा संपलेली आहे व सदरहू पुलांच्या देखभालीकरिता आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, डहाणू-नाशिक राज्य मार्गावरील पुलांची तात्काळ दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०६-२०१८) :** (१) सूर्या प्रकल्पांर्गत उजव्या तीर कालव्याच्या सा.क्र. ११/३७५ मी. वरील डहाणू-नाशिक राज्य मार्गावरील सुमारे ३५ वर्षे जुन्या पुलाच्या पृष्ठ लादीच्या दोन्ही कडेवरील लोह सळयांवरचे संधानकाचे आच्छादन निखळल्यामुळे लोहसळ्या उघडया पडल्या आहेत.

पृष्ठ लादीच्या प्राथमिक पाहणी अंती असे निदर्शनास येते की, सदर पुलास किरकोळ दुरुस्तीची आवश्यकता आहे. तथापि, पूल वाहतूकीस धोकादायक झालेला नाही.
(२) सूर्या प्रकल्पांतर्गत उजव्या व डाव्या कालव्यावरील लहानमोठे २०४ पूल सुमारे ३० ते ३५ वर्षे जुने आहेत. सर्वसाधारणपणे, बांधकामांचे आयुष्यमान सुमारे ५० वर्षे गृहीत धरण्यात येते. त्यामुळे सदर पुलांची आयुर्मर्यादा अद्याप संपलेली नाही.

तसेच मागील ५ वर्षात सदर पुलाच्या देखभाल दुरुस्ती करिता कोणत्याही प्रकारचा निधी खर्च करण्यात आलेला नाही.
(३) सूर्या प्रकल्पांतर्गत उजवा व डावा तीर कालव्यावरील वितरणप्रणालीसह सुमारे ३० ते ३५ वर्षे जुन्या सर्व बांधकामाची व प्रमुख रहदारी मार्गावरील सर्व पुलांची प्रत्यक्ष पाहणी करुन प्राधान्यक्रमाने दुरुस्तीची अंदाजपत्रके तयार करण्याचे काम विभागीय स्तरावर प्रगतीपथावर असून निधीचे उपलब्धतेनुसार दुरुस्तीची कामे करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयातील तेरणा धरणाची गळती थांबविणेबाबत**

**(२०) १०८२१८ (१२-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद शहरासह ढोकी,तडवळा, तेर, येडशी या चार गावातील जवळपास २.५० लाख लोकसंख्या पिण्याच्या पाण्यासाठी तसेच जवळपास २५०० हेक्टरहून अधिक क्षेत्र सिंचनासाठी तेरणा धरणावर अवलंबून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्याच्या होत असलेल्या समाधानकारक पावसामुळे धरण १००% भरले असून गतवर्षी धरण पूर्णक्षमतेने भरले असताना पाटबंधारे विभागाच्या निष्काळजीपणामुळे २५% पेक्षा अधिक पाणी वाया गेल्याने सदर गळती थांबविण्यासाठी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांस दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी व तत्पूर्वीही संबंधित विभागास निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार तेरणा प्रकल्पाची गळती थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे, तेरणा मध्यम प्रकल्प ता.जि.उस्मानाबाद या प्रकल्पाचा उस्मानाबाद शहर पाणी पुरवठा करण्याकरीता १.९८ द.ल.घ.मी. तसेच ढोकी व चार गावे पाणी पुरवठा करण्याकरीता १.५८ द.ल.घ.मी. पाणीसाठा आरक्षित आहे.

(२) दि.११ सप्टेंबर २०१७ रोजी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना सदर प्रकरणी निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे.

दि.०९.०९.२०१७ रोजी धरणाची पाणी पातळी ०.३० मी.सांडवा माथा पातळीच्या वर आली असता पाच गेटमधून सर्वसाधारण गळती आढळली होती. तथापि ही गळती दि.१०.०९.२०१७ रोजी सांडवा माथा पातळी व गेटचे रबरसील मध्ये ज्यूट बॅगद्वारे पूर्णपणे थांबविण्यात आली. त्यामुळे दि.१५.१०.२०१७ रोजी धरणामध्ये पूर्ण संचय पाणी पातळीपर्यंत (१००%) पाणीसाठा करण्यात आलेला आहे. तेव्हा २५% पेक्षा अधिक पाणी वाया गेले हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि धरणाच्या गोडबोले प्रकारच्या स्वयंचलीत दरवाज्यांच्या सुरळीत परिचलन होणेकरीता काउंटरवेटचे पुन: संकल्पना - बाबतची कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील नामपाडा-कुतरकुंड लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(२१) १०८९६१ (१०-०४-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजें सावरोली (सो) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील कुतरकुंड या डोहावर मंजूर झालेल्या नामपाडा-कुतरकुंड लघुपाटबंधारे प्रकल्पाचे काम गत दहा वर्षापासून बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार सदर प्रकल्पाचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) वनक्षेत्राच्या निर्वनीकरणाच्या प्रस्तावास अंतिम मान्यता न मिळाल्याने एप्रिल, २०१२ पासून काम बंद आहे.

(२) व (३) वन प्रस्तावातील तत्वत: मान्यतेच्या अटी व शर्तीची पूर्तता करून, अंतिम मान्यतेच्या प्रस्तावातील शे-याची पूर्तता केली आहे व वनवासी हक्क कायदा २००६ नुसार प्रांताधिकारी, भिवंडी यांचेकडून कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्याचा पाठपुरावा क्षेत्रीय स्तरावरून सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर येथे यांत्रिकी विभागाचे विभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत**

**(२२) १०९२६५ (२८-०३-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील मांजरा रेणा तावरजा तेरणा या नदीवर १६ मोठी बॅरेजेस,दोन उपसा सिंचन योजना, पाच मोठी प्रकल्प, अनेक लघु प्रकल्प व त्यावर जवळपास प्रत्येकी ८० किमी लांबीचे कालवे यांची सर्व कामे यांत्रिकी विभागामार्फत होत असून यासाठी यांत्रिकी विभागाचे तीन उपविभाग लातूर येथे आहेत, त्याचे विभागीय कार्यालय एक उस्मानाबाद व एक औरंगाबाद येथे असल्याने प्रशासकीय कामे व प्रस्ताव मंजुरीसाठी होत असलेली गैरसोय दूर करून तातडीने कामे होण्यासाठी औरंगाबाद येथील तीन पैकी एक विभागीय कार्यालय लातूर येथे स्थलांतरित करून सुरु करण्याबाबत लातूर ग्रामीण स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा.जलसंपदा मंत्री, मा.पालकमंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार जलसंपदा यांत्रिकी विभागाचे विभागीय कार्यालय लातूर येथे स्थलांतरित करण्यासह तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी लातूर येथील यांत्रिकी कामासाठी विभागीय व उपविभागीय कार्यालये स्थलांतरणाने उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अप्पर वर्धा पाटबंधारे मंडळ अमरावती अंतर्गत नव्याने निर्माण शाखा कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२३) १०९२७२ (१०-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अप्पर वर्धा पाटबंधारे मंडळ अमरावती अंतर्गत नव्याने निर्माण शाखा कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत मा.मंत्री (जलसंपदा) यांनी उच्चस्तरीय सचिव अस्मिती यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर रिक्त पदे भरतीची कार्यवाही करण्यात येईल असे दिनांक ८ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे भरतीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील मंजूर पदांचा आकृतीबंध सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सुधारित आकृतीबंध निश्चित झाल्यानंतर सिंचन व्यवस्थापन शाखा कार्यालयांना पदे उपलब्ध करुन देण्याची तसेच शासन धोरणानुसार रिक्त पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

---

## अकोला जिल्ह्यातील ५ हजाराहून अधिक सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन प्रलंबित असल्याबाबत

**(२४) १०९४६२ (२८-०३-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य व केंद्र सरकारी सेवानिवृत्त कर्मचा-यांनी माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये आपल्या हयातीचे दाखले संबंधित बँकांकडे जमा करूनही केवळ बँकेच्या हलगर्जीपणामुळे त्याची माहिती जिल्हा कोषागार कार्यालयाला सादर न केल्याने अकोला जिल्ह्यातील ५ हजाराहून अधिक पेन्शनधारकांना माहे डिसेंबर, २०१७ महिन्याची निवृत्ती वेतन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यानुसार तात्काळ आदेश देऊन निवृत्ती वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०५-२०१८) :** (१) प्रत्येक राज्य शासकीय निवृत्तीवेतन धारकांना प्रतिवर्षी नोव्हेंबर मध्ये आपल्या हयातीचे दाखले कोषागारात सादर करणे आवश्यक आहे. माहे नोव्हेंबर मध्ये हयातीचे दाखले कोषागारास प्राप्त न झाल्यास अशा निवृत्तीवेतनधारकांचे माहे डिसेंबर पासूनचे निवृत्तीवेतन कोषागार कार्यालयामार्फत अदा करण्यात येत नाही. अकोला कोषागार कार्यालयांमार्फत निवृत्तीवेतन घेत असलेल्या एकूण निवृत्तीवेतनधारकांपैकी माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये निवृत्तीवेतन प्रदान केलेल्या निवृत्तीवेतनधारकांची एकूण संख्या १४,३२८ आहे. माहे डिसेंबर २०१७ मध्ये काही निवृत्तीवेतनधारकांनी हयातीचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे एकूण १३,१३८ निवृत्तीवेतन धारकांना माहे डिसेंबर २०१७ चे निवृत्तीवेतन अदा करण्यात आले. त्यानुसार माहे नोव्हेंबर २०१७ मध्ये हयातीचे प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या निवृत्तीवेतनधारकांची संख्या केवळ १,१९० इतकी आहे. माहे जानेवारी २०१८ मध्ये एकूण ६८४ निवृत्तीवेतनधारकांनी हयातीचे दाखले सादर केले. त्यानुसार त्यांना माहे जानेवारी, २०१८ पासून नियमित निवृत्तीवेतन प्रदान करण्यात आाले. त्यानंतर वेळोवेळी हयातीच्या प्रमाणपत्रानुसार निवृत्तीवेतन प्रदान करण्यात आले आहे. दि.२३ एप्रिल, २०१८ पर्यंत एकूण १५२ निवृत्तीवेतनधारकांचे हयातीचे दाखले प्राप्त न झाल्यामुळे निवृत्तीवेतन बंद आहे. सदर निवृत्तीवेतन धारकांचे हयातीचे दाखले प्राप्त होताच निवृत्तीवेतन तात्काळ सुरु करण्यात येईल.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील नाग्यासाक्या धरणाचा कालवा व कालव्यावरील वितरिका अनेक वर्षांपासून नादुरुस्त असल्याबाबत**

**(२५) १०९४८४ (२८-०३-२०१८). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **लाभक्षेत्र विकास विभाग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव (जि.नाशिक) तालुक्यातील नाग्यासाक्या प्रकल्पाच्या उजवा कालव्याची वितरिका क्रमांक-१ ही नादुरुस्त असल्यामुळे आवर्तनाच्या कालावधीत या वितरीकेमधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होवून लाभ क्षेत्रातील साकोरे व नवे पांझण या गावातील लाभ धारक शेतकऱ्यांना पाण्याअभावी शेती सिंचनापासून वंचित राहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, मालेगांव, जिल्हा नाशिक या विभागाने वितरिका क्र.-१ ची दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे प्रशासकीय मंजुरी देवून निधीची तरतूद करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे. तात्पुरती उपाय योजना करुन सिंचनासाठी पाणी देणेत आले आहे.

(२) व (३) वितरीकेच्या दुरुस्तीचा प्रस्ताव गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास सादर करण्यात आला होता. परंतु त्रुटी पूर्ततेस्तव प्रस्ताव महामंडळाने दि.१०.०१.२०१८ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,उत्तर महाराष्ट्र प्रदेश,नाशिक यांना परत केलेला असून शेरे पूर्ततेची कार्यवाही प्रादेशिक कार्यालय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टाळंबा (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) पाटबंधारे प्रकल्पांतर्गत बुडीत क्षेत्रातील विस्थापितांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(२६) १०९८३० (१०-०४-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाळंबा पाटबंधारे प्रकल्पांतर्गत (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) बुडीत क्षेत्रातील विस्तापितांचे अद्याप पुनर्वसन झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन उपलब्ध करुन देण्यासाठी प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात समाविष्ट असलेल्या गावांमधील ८ एकरापेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतक-यांना जमीन विक्री, हस्तांतरण, खातेफोट, घडेवाटप आदींसाठी शासनाने निर्बंध घातले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०६-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) टाळंबा मोठा पाटबंधारे प्रकल्पातील विस्थापित कुटुंबाना द्यावयाच्या पर्यायी शेतजमीनी करीता प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील ८ एकर पेक्षा जास्त जमीन धारण करणा-या शेतक-यांना जमिन हस्तांतर करणे, पोटविभागणी करणे सुधारणा करणे इत्यादीवर पुनर्वसन अधिनियमातील कलम १२(२) नुसार २१ जुलै, १९८८ मध्ये निर्बंध जारी करण्यात आलेले आहेत. सदर वेळेपासून या प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील ६४ गावातील शेतक-यांना धडेवाटप, पोटविभागणी व जमिन विक्री करण्यावर निर्बंध लागू आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाहीत.

---

**बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील केळझर उजव्या कालव्याला अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात गळती लागून हजारो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत**

**(२७) ११०२४८ (१३-०४-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बागलाण (जि.नाशिक) तालुक्यातील केळझर उजव्या कालव्याला अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात गळती लागून दररोज हजारो लिटर पाणी वाया जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केळझर उजव्या कालव्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव गेल्या दहा वर्षापासून जलसंपदा विभागाकडे प्रलंबीत असल्याने शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर उजव्या कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार कालवा दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) नाही. केळझर उजवा कालवा अस्तित्वात नाही.
(२) बागलाण तालुक्यात केळझर उजवा कालवा अस्तित्वात नसून केळझर डावा कालवा आहे. ज्या ठिकाणी केळझर डावा कालवा भरावाच्या भागातून जातो त्या भागात कालव्यास गळती आहे. त्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) केळझर डावा कालव्याचे दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, प्रशासकीय मंजूरीच्या प्रक्रियेत आहे. प्रशासकीय मंजूरीनंतर निधी उपलब्धतेनुसार कामे करण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील उजनीच्या नदीवरील बंधाऱ्यांची झालेली दुरवस्था

**(२८) ११०५२६ (१३-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयातील उजनीच्या उगमापासून नदीवरील सद्यस्थितीत असलेली बंधाऱ्यांची दुरवस्था झाली असून काही ठिकाणी पाणी गळतीचे प्रमाण प्रचंड असतानाही बंधाऱ्यांची दारे ३१ मे ला उघडण्यात येत असल्याने सोलापूर जिल्हयात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील पाण्याची टंचाईचा विचार करता बंधाऱ्याचे दरवाजे ३० जुलै रोजी उघडू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
सोलापूर शहर पाणी पुरवठ्यासाठी उजनी धरणातून दरवर्षी ४ ते ५ वेळा भीमा नदीत पाणी सोडण्यात येत असल्यामुळे भीमा नदीमध्ये पाण्याची तीव्र टंचाई जाणवत नाही.
(२) पावसाळ्यात केंव्हाही पूर परिस्थिती निर्माण होऊन को.प.बंधारा क्षतीग्रस्त होण्याची शक्यता असल्याने महाराष्ट्र शासन,जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.०३/०७/२००२ मधील निर्देशानुसार दरवर्षी मे महिन्याच्या शेवटच्या आठवडयात को.प.बंधा-यातील बर्गे काढणे आवश्यक आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महागाव (जि.यवतमाळ) येथील लोअर पूस प्रकल्पात क्षमतेपेक्षा निम्मेच सिंचन होत असल्याबाबत

**(२९) ११०५५९ (१२-०४-२०१८). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महागाव (जि.यवतमाळ) येथील लोअर पूस प्रकल्पात १० हजार हेक्टर सिंचनाची क्षमता असतांना आता केवळ निम्मेच सिंचन होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

लोअर पूस प्रकल्पाची प्रकल्पिय सिंचन क्षमता ९११० हे. एवढी असून मागील पाच वर्षातील सरासरी प्रत्यक्ष सिंचन ५५८० हे. इतके आहे.

विदर्भात खरीप हंगामात पाणी मागणी कमी असते. तसेच सदर प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात विहिरी व कुपनलिकेद्वारे अप्रत्यक्ष सिंचन होत असल्यामुळे प्रकल्पातून सिंचनाची पाणी मागणी कमी होत आहे.

(२) चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रकल्पावर पूर्ण क्षमतेने सिंचन राबविण्याकरिता मुख्य कालवा व वितरण प्रणालीच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३०) ११०७५७ (१०-०४-२०१८). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी तसेच दुष्काळाने ग्रासलेल्या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाने सदरहू प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनास अद्यापपर्यंत किती निधी उपलब्ध करून दिला आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) विदर्भ व मराठवाड्यातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील आणि उर्वरित महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्ह्यातील ११२ प्रकल्प / प्रकल्प घटक पूर्ण करण्याकरिता विशेष पॅकेज मिळण्यासाठीचा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला आहे.
(२) सदर प्रस्ताव केंद्र शासनाच्या विचाराधीन असून मान्यतेनंतर निधी प्राप्त होणे अपेक्षित आहे. अद्याप निधी वितरित झालेला नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इगतपुरी व त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) या तालुक्यातील अपर वैतरणा धरणासाठी घेण्यात आलेल्या जमीनीपैकी विनावाटपाची जमीन मुळ मालकांना परत करण्याबाबत**

**(३१) १११२१३ (१३-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इगतपुरी व त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) या तालुक्यातील अपर वैतरणा धरणासाठी घेण्यात आलेल्या जमीनीपैकी १५०० एकर जमीन विनावाटपाची असून ती सन १९७८ पासून पडिक असल्याने सदरहू जमीन मुळ मालकांना परत करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबधिताकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अदयापी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अनेक एकर पडून असलेली जमीन मूळ मालकांना परत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

अपर वैतरणा धरणासाठी संपादित केलेल्या जमीनीपैकी ६२३.२२ हेक्टर (१५९.३६ एकर) जमीन ही अतिरिक्त असून सदर जमीनी मूळ मालकांना परत करण्यासाठीचा प्रस्ताव सन १९८८ मध्ये विभागीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे सादर केलेला आहे.
(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार एकदा संपादित केलेली जमीन मुळ मालकांस परत करण्याबाबत निर्बंध असल्याने या प्रकरणी कार्यवाही करता येत नाही.
शासन निर्णय क्र:-एलक्युएन३०/२००/प्र.क्र.६७/अ-२, दि.१२/३/२००४ अन्वये अतिरिक्त जमीन मुळ मालकांस परत न करता जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात यावी, असे आदेश आहेत. त्यानुसार विभागीय आयुक्त, नाशिक यांनी मागितल्यानुसार अतिरिक्त जमीनीचे मुल्यांकन करुन जमीनीची किंमत व सर्व्हे नंबर आयुक्त कार्यालयाकडे सादर करण्यात आले असून जमीनी परत करण्याची कार्यवाही महसूल खात्यामार्फत केली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साखरपा-कोंडगाव (ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी) येथील धरणातून होत असलेली गळती**

**(३२) १११३५५ (२५-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरपा-कोंडगाव (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) येथील धरणातून गळती होऊन हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार धरणातून होत असलेली गळती थांबविण्यासाठी धरणाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) साखरपा-कोंडगाव येथील धरणातून होणा-या गळती संदर्भात क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी केली असून सदर पाहणीत मुख्य विमोचकाच्या डिव्हाईड वॉलमधून गळती होत असल्याचे निदर्शनास आले.
(३) धरणाच्या सुरक्षिततेसाठी तसेच भविष्यात पाण्याची तीव्र टंचाई भासू नये यादृष्टीने यांत्रिकी विभागामार्फत गेट दुरुस्तीचे व रबर सिल बसविण्याचे काम करण्यात आले आहे.
तसेच विमोचक विहिरीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी उजवा व डावा कालव्याची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३३) १११८९३ (२८-०३-२०१८). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरगाव (जि.अहमदनगर) येथील गोदावरी उजवा व डावा कालवा यांचे मजबुतीकरण नुतनीकरणाची कामे अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या अनेक वर्षापासून सदर प्रकल्प प्रलंबित आहेत व प्रकल्पाची अद्याप ४५ टक्केच कामे पूर्ण झाली असल्याने अनेक गावातील शेतकऱ्यांची पाण्याअभावी गैरसोय झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामांना होत असलेल्या विलंबाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, त्यानुसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह प्रकल्पाची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) व (२) गोदावरी कालवे नूतनीकरण तसेच आधुनिकीकरणाची कामे प्रगतीत असून आजपावेतो एकूण ३० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. तसेच कालव्याद्वारे व वितरिकांद्वारे शेतीसाठी पाण्याचे वितरण करणेत येत आहे. त्यामुळे गावातील शेतक-यांचे पाण्याअभावी गैरसोय झाली हे खरे नाही.

(३) निधी उपलब्धतेनुसार अपूर्ण कामे हाती घेऊन पूर्ण करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुळा मुठा उजवा कालव्यात प्लास्टिक कचरा साचल्याने**
**कालव्याच्या पाणी गळतीमध्ये झालेली वाढ**

**(३४) १११९९५ (३१-०३-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुळा मुठा उजवा कालव्यात सातत्याने प्लास्टिकजन्य पदार्थ टाकले जात असल्याने यवत (ता.दौंड,जि.पुणे) हद्दीत कालव्याच्या तळाला मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा साचल्याची बाब दिनांक ४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मूलतःच या कालव्याला मोठ्या प्रमाणावर तडे गेल्यामुळे यामधून मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होत होती व आता तळाशी प्लास्टिक साचल्याने पाणी गळतीमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त प्लास्टिकच्या थरामुळे नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार प्लास्टिक कचरा कालव्यात टाकणाऱ्यांवर कारवाई करण्यासह प्लास्टिक कचरा कालव्यात टाकू नयेत यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) जलसंपदा विभागा कडे तक्रारी प्राप्त नाहीत.
(४) प्लास्टिक कचरा कालव्यात टाकू नये याबाबत नागरीकांना जलसंपदा विभागा मार्फत कळविण्यात आलेले असून याबाबतचे सूचना फलक देखील कालव्याच्या बाजूला लावण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील अनेक पाटबंधारे योजना अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३५) ११२३७३ (११-०४-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील अनेक पाटबंधारे योजना मागील पंधरा ते सोळा वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वडशेतवावे धरणाचे ७० टक्के काम झालेले असून निधीच्या कमतरतेमुळे व भूसंपादन प्रकिया प्रलंबित असल्यामुळे हे काम मागील १० वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार उक्त पाटबंधारे योजना तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) श्रीवर्धन तालुक्यातील वडशेतवावे लघु पाटबंधारे योजना व हरिहरेश्वर-मारळ(पाणीपुरवठा) योजना असे २ प्रकल्प बांधकामाधीन आहेत.
(२) व (३) धरणाच्या जलमग्न क्षेत्रातील ६.०२ हेक्टर वन जमिन हस्तांतरणास मान्यता नसल्याने वर्ष २००९ पासून धरणाचे काम बंद आहे.
(४) प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ७५.४८ हेक्टर जमिनीपैकी ३३.६६.९ हेक्टर जमिन संपादित केली आहे. बुडीत क्षेत्रातील ६.०२ हेक्टर वनजमिनीचे निर्वनीकरण प्रस्तावाबाबत क्षेत्रीय स्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत वन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आसनखेड गावासाठी (ता.पाचोरा, जि.जळगांव) बहुळा धरणातून पाटचारीचे काम करणेबाबत**

**(३६) ११२४५५ (११-०४-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आसनखेड गावासाठी (ता.पाचोरा, जि.जळगांव) बहुळा धरणातून पाटचारीचे काम होणेबाबत माहे मार्च, २०१७ पासून वारंवार स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंपदा मंत्री व राज्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार या पाटचारीचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) होय.
(२) आसनखेडा येथील ग्रामस्थांच्या मागणीस अनुलक्षून यापूर्वी आसनखेड गावासाठी (ता.पाचोरा, जि.जळगाव) बहूळा धरणातून पाटचारीचे काम करण्याबाबत विभागामार्फत सर्वेक्षण

करण्यात आले असून, सदर सर्वेक्षण अहवालानुसार बहूळा धरणाच्या उजव्या तीरावरून निघण्याऱ्या कालव्याच्या हडसन गावाजवळ तळतलांक २४२.६० मी. इतका आहे. हडसन गावाकडून आसनखेडा गावाकडे चढ असून तेथील शेतजमीन ही कालवा तळ तलांकापेक्षा १५ ते २० मी. उंचावर आहे. त्यामुळे मागणी करण्यात आल्यानुसार तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्यता नसल्याने चारी काढाणे शक्य होणार नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यभरातील कोषागारातील रिक्त पदांबाबत**

**(३७) ११२६३३ (०४-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरातील कोषागारांमध्ये वित्त आणि लेखा सेवेची जवळपास १००० पदे रिक्त असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वित्त व लेखा विभाग शासनाचा मुख्य विभाग असूनही कोषागारातील रिक्त पदे न भरल्याने अनेक कामे प्रलंबीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१६-०५-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) कोषागारातील कामे रिक्त पदांअभावी प्रलंबित राहू नये म्हणून तात्पुरत्या स्वरुपात बाह्य यंत्रणेव्दारे पदे भरण्याबाबतची कार्यवाही संचालनालयाच्या स्तरावरुन करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कोयना धरण पायथा व वैतरणा या जलविद्युत प्रकल्पाच्या नूतनीकरण व आधुनिकीकरणाच्या कामासाठी निधी मिळण्याबाबत**

**(३८) ११२७१० (३१-०३-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कोयना धरण पायथा व वैतरणा या जल विद्युत प्रकल्पाच्या नूतनीकरण व आधुनिकीकरणाच्या कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम शासनाने सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अहवालाची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, सदरहू जलविद्युत प्रकल्पांच्या नूतनीकरण व आधुनिकीकरणाच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०६-२०१८) :** (१) होय.
(२) कोयना धरण पायथा व वैतरणा जलविद्युत प्रकल्पांच्या नुतनीकरण व आधुनिकीकरण कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(३) कोयना धरण पायथा व वैतरणा या जलविद्युत प्रकल्पांचा नुतनीकरण व आधुनिकीकरणाबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल, राज्य तांत्रिक सल्लागार समिती, पुणे यांच्या छाननीनंतर शासनास प्राप्त झाल्यावर सदर कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील भिमा नदीवरील मांडवगण फराटा, सादलगाव दरम्यान असलेल्या कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्यावर नवीन ढापे बसविण्याबाबत**

**(३९) ११३१७० (३१-०३-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर (जि.पुणे) तालुक्यातील भिमा नदीवरील मांडवगण फराटा, सादलगाव दरम्यान असलेल्या कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्यावर ढापे जिर्ण झाल्याने माहे डिसेंबर, २०१७ पासुन मोठ्या प्रमाणात पाणी गळती सुरु झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटदाराने ढापे टाकतांना कामामध्ये दिरंगाई केल्याने या बंधाऱ्यात नवीन ढापे टाकुनही पाणी गळती होत असल्याचे निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार भिमा नदीवरील मांडवगण फराटा, सादलगाव दरम्यान असलेल्या कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्यावर नवीन ढापे बसविण्यासह ढापे बसविण्याच्या कामात दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सन २०१७ चे पावसाळयामध्ये सर्व को. प. बंधाऱ्यामध्ये १०० टक्के पाणीसाठा करणेचे उदिष्ट साध्य करण्यासाठी कानगांव बंधाऱ्यास २१० नविन बर्गे उपलब्ध करून देण्यात आले होते. हे नविन बर्गे व जुने बर्गे यांची सांगड घालून हा बंधारा पूर्ण क्षमतेने अडविण्यात आला होता. पाण्याचे दाबामुळे जुने बर्गे (निडल्स) काही ठिकाणी सरकल्याने बंधाऱ्यामधून अत्यल्प प्रमाणात गळती सूरू झाली होती. ही बाब क्षेत्रीय स्तरावर लागलीच निदर्शनास आल्याने तातडीने सरकलेले बर्गे पुन्हा जागेवर

बसवून बंधारा परत पूर्ण क्षमतेने अडविण्यात आला आहे. याबाबत कंत्राटदार अथवा क्षेत्रिय स्तरावरून दिरंगाई झालेली नाही, त्यामुळे कंत्राटदार अथवा कोणावरही कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### मेट्रिकेत्तर शिष्यवृत्तीसाठी आता पात्र विद्यार्थ्यांना आई-वडिलांसह प्राचार्यांचे हमीपत्र देणे अनिवार्य करण्यात आल्याबाबत

**(४०) ११३२२६ (१३-०४-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र आणि राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क आदी योजनांचे निकष ठरविणारे परिपत्रक दि.९ जानेवारी, २०१८ रोजी विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व शिषेश मागास प्रवर्ग कल्याण विभागाने काढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधी ऑनलाईन त्यानंतर ऑफलाईन असा प्रवास करणा-या मेट्रिकेत्तर शिष्यवृत्तीसाठी आता पात्र विद्यार्थ्यांना आई-वडिलांसह प्राचार्यांचे हमीपत्र देणेही अनिवार्य करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०६-२०१८) :** (१) होय.

फक्त साध्या कागदावर हमी पत्र देणे आवश्यक आहे.

(२) होय.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक पाटबंधारे विभागातील गोदावरी डावा तट कालवा, गोदावरी उजवा तट कालवा, नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यावरील अधिकारी व कर्मचारी संख्येत वाढ करणेबाबत

**(४१) ११३५१९ (११-०४-२०१८). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पाटबंधारे विभागातील गोदावरी डावा तट कालवा, गोदावरी उजवा तट कालवा , नांदूर मध्यमेश्वर जलद कालव्यावरील अधिकारी व कर्मचारी संख्या मंजुर पदा इतकी नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदे मंजूर असूनसुध्दा कालव्यावरील कामे अपूर्णावस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) होय.
(२) गोदावरी कालवे सिंचन व बिगर सिंचनाच्या आवर्तनासाठी बारमाही नियमित प्रवाहित असल्याने, कालव्यांच्या नुतनीकरणाची कामे जलद गतीने करण्यास मर्यादा येत आहे. तरीही कालव्यांमधील आवर्तनाचा कालावधी कमी करुन, काही कालव्यांची नुतनीकरणाची कामे पूर्ण करण्यात आली असून, उर्वरित कामासाठी निधी मंजूरीच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.
(३) क्षेत्रिय कार्यालयातील पदांचा प्रचलित आकृतीबंध सुधारीत करण्याची कार्यवाही शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सिंचन पाटबंधारे महामंडळाकडून राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यासाठी बैठका घेण्याबाबत**

**(४२) ११३७१९ (१२-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सिंचन पाटबंधारे महामंडळाकडून राबवल्या जाणाऱ्या प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यासाठी सिंचन नियामक मंडळ असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तापी, विदर्भ,गोदावरी,कोकण, कृष्ण खोरे पाटबंधारे विकास महामंडळ या वैधानिक आणि स्वायत्त सिंचन महामंडळाच्या माध्यमातून जलसंपदा विभाग राज्यातील सिंचन विकासाची कामे करीत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,या सर्व महामंडळाच्या एका वर्षात ३० दिवसांच्या कालवधीत किमान १२ बैठका घेण्याबाबतची तरतूद अधिनियमामध्ये आहे त्यानुसार राज्यातील वैधानिक व स्वायत्त सिंचन महामंडळाच्या दिनांक १ जानेवारी, २०१७ ते ३१ जानेवारी, २०१८ अखेर या महामंडळाच्या कोणकोणत्या तारखाना मा.जलसिंचन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठका घेण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे,
(४) असल्यास, उक्त सिंचन महामंडळाच्या बैठका गेल्या वर्षभरात झाल्या नसल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कामात दिरंगाई करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यासह राज्यातील सिंचन विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०६-२०१८) :** (१) राज्यातील महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, तापी, कोकण, विदर्भ व गोदावरी मराठवाडा या ५ सिंचन विकास महामंडळाच्या अधिनियमातील कलम ७ मध्ये महामंडळाची बैठक घेणेबाबत तरतूद आहे. महामंडळाच्या बैठकीस नियामक मंडळाची बैठक म्हणून संबोधिले जाते.

(२) होय.

(३) ०१ जानेवारी २०१७ ते ३१ जानेवारी २०१८ या कालावधीत घेण्यात आलेल्या महामंडळाच्या बैठका खालीलप्रमाणे आहेत.

१.<u>कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे.</u>

१. ६९ वी बैठक दि. १७/०३/२०१७

२. ७० वी बैठक दि. १९/०६/२०१७

३. ७१ वी बैठक दि. ३१/०१/२०१८

२.<u>महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पूणे.</u>

१. ९४ वी बैठक दि. २७/०३/२०१७

२. ९५ वी बैठक दि. १९/०६/२०१७

३. ९६ वी बैठक दि. ३१/०१/२०१८

३. <u>गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.</u>

१. ६३ वी बैठक दि. १४/०३/२०१७

२. ६४ वी बैठक दि. १९ जून, २०१७

४. <u>विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.</u>

१. ६६ वी बैठक दि. १५/०३/२०१७

२. ६७ वी बैठक दि.१९/०६/ २०१७

३. ६८ वी बैठक दि. ३१/०१/२०१८

५. <u>तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.</u>

१.दि. १७/०३/२०१७,

२.दि. १९/०६/२०१७,

३.दि. ३१/०१/२०१८.

(४) विषयांच्या आवश्यकतेनुसार बैठका घेण्यात आल्या असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १३२ सिंचन प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने ९२०० कोटी रुपयांचा निधी देवूनही प्रकल्प अपूर्ण असल्याबाबत**

**(४३) ११४१०० (११-०४-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १३२ सिंचन प्रकल्प तातडीने पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने ९२०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निधीमधून पूर्ण होणा-या सिंचन प्रकल्पामधून सुमारे १ लाख ४० हजार ६११ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी उपलब्ध झाल्यामुळे हे प्रकल्प किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) नाही. तथापी विदर्भ व मराठवाड्यातील १२ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील आणि उर्वरित महाराष्ट्रातील ६ अवर्षणप्रवण जिल्ह्यातील एकूण ११२ प्रकल्पांसाठी केंद्र शासनाने विशेष पॅकेज अंतर्गत निधी देण्यास तत्वत: मान्यता दिली आहे.
(२) सदर ११२ प्रकल्प पुर्ण झाल्यानंतर अतिरिक्त ४ लाख ६० हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.
(३) पुरेसा निधी उपलब्ध झाल्यास सदर प्रकल्प सन २०२०-२१ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणेगाव (ता.चांदवड, जि.नाशिक) डावा कालव्याचे विस्तारीकरणाची कामे अपूर्ण असल्याबाबत

**(४४) ११४१८१ (१२-०४-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणेगाव कालवा (ता.चांदवड, जि.नाशिक) हा १ ते ६३ कि.मी.पर्यंत असून सदर कालव्याची कि.मी.१ ते २५ मधील विस्तारीकरणाची कामे अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कि.मी.१ ते २५ मधील विस्तारीकरणाची कामे पूर्ण केल्यास कालव्याची वहन क्षमता वाढू शकेल व त्यामुळे चांदवड तालुक्यातील अवर्षण प्रवण व पाणी टंचाई दूर होण्यास मदत होऊन या परिसरातील गावे टँकर मुक्त होतील व अवर्षण ग्रस्त भागातील सुमारे ४००० हेक्टर क्षेत्रातील शेतक-यांना सिंचनाचा लाभ मिळू शकेल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणेगाव डावा कालव्याचे कि.मी.१ ते २५ मधील विस्तारीकरण व अपूर्ण वितरीकांची कामे करण्यासाठी सन २०१८-१९ मध्ये पुणेगाव प्रकल्पास जास्तीत जास्त आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कालव्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यानुसार कालव्याच्या विस्तारीकरणासह अपूर्ण वितरीकांची कामे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१८-०६-२०१८) :** (१) उर्ध्व गोदावरी प्रकल्प, जि.नाशिक या प्रकल्पास रु. ९१७.७४ कोटी इतक्या किंमतीसाठी तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दि.१०/११/२०१७ अन्वये प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार जानेवारी, २०१८ पासून कालव्यावरील अपूर्ण कामे पूर्ण करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) पुणेगांव डावा कालव्याचे कि.मी. १ ते २५ मधील विस्तारीकरणाची कामे झाल्यास कालव्याची वहन क्षमता सुधारित संकल्पनानुसार २२१.४८ घनफुट प्रती सेकंद इतकी होईल. सद्य:स्थितीत मार्च, २०१८ अखेर या प्रकल्पावर ४६०८ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. कि.मी. १ ते २५ मधील विस्तारीकरणाची कामे व उर्वरित मायनरची कामे पूर्ण झालेनंतर एकुण ६९८४ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होईल.

(३) होय.

(४) उर्ध्व गोदावरी प्रकल्पातंर्गत पुणेगांव प्रकल्पाचा समावेश आहे. परंतु अर्थसंकल्प पुस्तिकेत पुणेगांव प्रकल्पासाठी स्वतंत्रपणे तरतुद दर्शविली नसून उर्ध्व गोदावरी प्रकल्पासाठी रू. १०१.४९ कोटी इतकी तरतुद सन २०१८-१९ साठी केलेली आहे. तरी पुणेगांव प्रकल्पासाठी यातुन किंवा स्वंतत्रपणे आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करून दिल्यास पुणेगांव डावा कालव्याची उर्वरीत कामे व कि.मी १ ते २५ मधील विस्तारीकरणाची कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यानुसार नवीन अंदाजपत्रके सन २०१७-१८ च्या दरसुचीनुसार तयार करण्याची कामे क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाहीत.

---

**अकोला जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेच्या मंजूर निधीमधून जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी नियमबाहय कुस्ती मॅटस खरेदी केल्याबाबत**

**(४५) ११४४९८ (०४-०४-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा नियोजन समितीच्या नाविन्यपूर्ण योजनेमधून सन २०१५-२०१६ मध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी अकोला यांना रु.६८.४७ लक्ष निधी वितरीत केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर नाविन्यपूर्ण योजनेच्या मंजूर निधीमधून जिल्हा क्रीडा अधिकारी अकोला यांनी नियमबाहय रित्या कुस्ती मॅटस खरेदी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०६-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. जिल्हा क्रिडा अधिकारी, अकोला यांनी विहित ई-निविदा कार्यपध्दतीचा अवलंब करुन कुस्ती मॅटस खरेदी केल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भोर (जि.पुणे) या तालुक्यातील भाटघर धरणाची व कोल्हापूर बंधा-यांची दुरुस्तीचे काम करण्यासाठी प्रशासनाची मान्यता मिळण्याबाबत

**(४६) ११४७४५ (१२-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर (जि.पुणे) या तालुक्यातील भाटघर धरणाची व कोल्हापूर बंधा-यांची दुरुस्तीचे काम करण्यासाठी प्रशासनाची मान्यता मिळण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान ससचिव, जलसंपदा विभाग, मुंबई यांना दिनांक २८ डिसेंबर,२०१७ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार भाटघर धरणाची व कोल्हापूर बंधा-याची दुरुस्ती करण्यासाठी मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) होय.

(२) प्रस्तुत कामे विशेष दुरूस्ती अंतर्गत प्रस्तावित केली होती, परंतू मा.राज्यपाल यांच्या वित्तीय निर्बंधानुसार महामंडळाच्या वार्षिक अर्थसंकल्पात एकूण तरतूदीच्या २ टक्केच्या आत ERM अंतर्गत कामे घेणे बंधनकारक करण्यात आले असल्यामुळे आणि सद्य:स्थितीत सदर कामे महामंडळाच्या वार्षिक अर्थसंकल्पात एकूण तरतूदीच्या २ टक्के च्या आत बसत नसल्याने व अतिरिक्त दायित्व निर्माण होऊ नये यासाठी कामे प्रस्तावित करण्यास मर्यादा आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर कामे करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेळगाव बॅरेज (ता.यावल, जि.जळगांव) योजना निधी उपलब्ध करण्याबाबत

**(४७) ११५०३१ (१३-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेळगांव बॅरेज, (ता.यावल, जि.जळगाव) या योजनेला निधी मिळण्यासंबंधीचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ यानी जलसंपदा विभागाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) होय. शेळगाव बॅरेज (ता.यावल, जि.जळगाव) या योजनेला निधी मिळण्याबाबतचा प्रस्ताव कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळाने दि.२४/११/२०१७ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

(२) विदर्भ व मराठवाडयातील आत्महत्याग्रस्त जिल्हयातील तसेच उर्वरित महाराष्ट्रातील अवर्षण प्रवण भागातील बांधकामाधीन पाटबंधारे प्रकल्प कालबध्दरितीने पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केंद्रीय अर्थसहाय्य मिळणेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावात शेळगाव बॅरेज (ता.यावल, जि.जळगाव) या योजनेचा समावेश आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयातील सिंचनाची कामे पूर्ण करुन भूसंपादन मोबदला देण्याबाबत**

**(४८) ११५०४७ (१२-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात सिंचनाची अनेक कामे प्रलंबित व अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार सिंचनाची कामे तात्काळ पूर्ण करण्यासह निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१३-०६-२०१८) :** (१) जळगाव जिल्ह्यात ८ मोठे, ४ मध्यम व ५ लघू प्रकल्प बांधकामाधीन आहेत. तसेच ६ मध्यम व ३३ लघू प्रकल्पांची अवशिष्ट कामे बाकी आहेत.

(२) सदर प्रकल्पांबाबत विविध स्तरावर वेळोवेळी आढावा घेण्यात येतो.

(३) ज्या प्रकल्पांपासून पुढील ३ वर्षामध्ये प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांस मिळू शकेल, अशा प्रकल्पांना प्राधान्य देण्याचा निर्णय वित्त विभागाच्या श्वेतपत्रिकेमध्ये शासनाने घेतला आहे. सदर प्रकल्पांच्या निधी उपलब्धतेसाठी मा.राज्यपाल महोदयांचे निर्देश व राज्याच्या अर्थोपायाच्या स्थितीनुसार सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) तालुक्यातील शेतक-यांना शेतीसाठी पुरविण्यात येणा-या पालखेड कालव्यातील पाणी आवर्तनाबाबत**

**(४९) ११५२८५ (१२-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील शेतक-यांना शेतीसाठी पुरविण्यात येणा-या पालखेड कालव्यातील पाणी पहिले आवर्तन ५ डिसेंबर, २०१७ ते ५ जानेवारी, २०१८ आणि दुसरे आवर्तन पुढे दिनांक २५ फेब्रुवारी, २०१८ रोजी पर्यंत असे कालवा सल्लागार समितीत मान्य करुन त्यानुषंगाने निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालखेड कालव्यातील शेती सिंचनासाठीचे पाणी दिनांक १३ ते ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंतच चालून निर्णयाचे उल्लंघन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) होय.
(२) होय, क्षेत्रिय परिस्थितीनुसार आवर्तनाचे वेळापत्रकात बदल केला आहे.
(३) क्षेत्रिय परिस्थितीनुसार आवर्तनाच्या वेळापत्रकात बदल करणे अपरिहार्य ठरले. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## नाशिक गंगापुर धरण डाव्या कालव्याच्या जागेवर असलेल्या वृक्षांची जलसंपदा विभागाकडून होत असलेली वृक्षतोड

**(५०) ११६१०० (१३-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक गंगापूर धरणाच्या डाव्या कालव्यालगत असलेल्या बाभूळ वृक्षांची जलसंपदा विभागाकडून वृक्षतोड होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाभळीचे वृक्ष हे वीस फुटापेक्षा अधिक वाढलेले असून दाट वृक्षामुळे चांगल्याप्रकारे या ठिकाणी नैसर्गिकरित्या जैवविविधतेची जोपासणा होत होती वृक्षतोडीमुळे पक्ष्यांचा निवारा धोक्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन विभाग व तहसिलदार यांच्याकडून वृक्षतोडीची परवानगी घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार अवैध वृक्षतोड करणाऱ्या पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-०६-२०१८) :** (१) होय, नाशिक येथील गंगापूर धरणाच्या डाव्या कालव्यालगत लोकवस्तीस धोकादायक अशा मर्यादित बाभूळ वृक्षांची तोड स्थानिक नागरिकांच्या दि. ६/११/२०१७ च्या मागणी अर्जानुसार तसेच कालव्याच्या भरावास होणारा संभाव्य धोका टाळण्यासाठी करण्यात आलेली आहे.
(२) गंगापूर धरणाच्या डाव्या कालव्यालगत असलेल्या मर्यादित वृक्षांची तसेच स्थानिक नागरिकांच्या निवेदनानुसार व कालव्याच्या भरावास नुकसान होऊ शकेल अश्याच बाभूळ वृक्षांची तोड करण्यात आलेली आहे. तसेच कालव्याच्या परिसरातील इतर जातीचे मोठया

वृक्षांची तोड करण्यात आलेली नाही. त्यामुळे नैसर्गीक जैव विविधतेची जोपासना करतांना पक्षांचा निवारा धोक्यात आलेला नाही.
(३) होय, सदर धोकादायक ४०-बाभळी व १८-निलगीरी वृक्षांची तोड तहसिलदार, नाशिक यांनी "महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत अधिनियम १९६४ कलम ३ (अ), ३ (ब) "मधील तरतुदीनुसार असलेल्या अधिकाराचा वापर करुन परवानगी दिलेली आहे. तसेच नमूद झाडांचे मूल्यांकन वनपरिक्षेत्र अधिकारी, नाशिक (प्रादेशिक) यांचे कार्यालयामार्फत करण्यात आलेले आहे.
(४) गंगापूर धरणाच्या डाव्या कालव्याच्या जागेतील मर्यादित व धोकादायक वृक्षांची तोड शासनाच्या प्रचलित नियमानुसार झालेली असल्याकारणाने प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.